या न्यायालयाची व्ही.सी. गूगल मिट ॲप द्वारे कोड क्र. yhd-jhkg-bnz ने मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, कल्याण येथे व्ही.सी. सोबत दूपारी १:०० वाजताच्या सूमारास जोडली गेली. तेथे हजर असलेले साक्षीदारास या न्यायालयातील चित्र दिसत असल्याबाबत व आवाज ऐकू येत असल्याबाबत खात्री केली. तसेच या न्यायालयातील उपस्थीत सर्वांना सदर साक्षीदार दिसत असल्याबाबत व त्यांचा आवाज ऐकू येत असल्याबाबत सूद्धा न्यायालयास खात्री झाली व त्यानंतर साक्षीदाराचा जवाब नोंदविण्यात आला.

नि.फौ.ख.क्र.७५/२०२२.
सरकार वि. अशफाक
नि.क्र.२२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | बळीरामसिंग शंकरसिंग परदेसी, |
| वय | : | ५६ वर्षे, व्यवसाय : पोलीस निरीक्षक, |
| नेमणुक | : | महात्मा फूले चौक, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर. |

**सरतपासणी-सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डी.आय.बारस्कर यांच्यामार्फत शपथेवर सूरु:-**

१) दिनांक ०५.११.२०२१ रोजी मी हिंगणा पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी फिर्यादी नावे सौ सपना राजू तेलंग यांनी आमच्या पोलीस स्टेशनला येवुन आरोपींविरुद्ध तोंडी रिपोर्ट दिला. त्यानुसार गुन्हा रजीस्टर क्र. ५७५/२०२१ भादवी कलम ३५४-ए(i)(iii),३५४, २९४ व माहिती व तंत्रज्ञान कायद्याचे कलम ६७ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हा हा पोलीस हवालदार बाबुराव मडावी यांनी नोंदविला. सदर गुन्हा हा महिला पोलीस शिपाई शिल्पा नंदागवळी यांच्यासमक्ष नोंदविण्यात आला होता. सदर गुन्हा नोंदविल्यानंतर घटनास्थळ पंचनामा हा पोलीस हवालदार बाबुराव मडावी यांनी केला होता. तसेच सदर गुन्हयामध्ये आरोपीला अटक सुद्धा पोलीस हवालदार बाबुराव मडावी यांनी केली. तसेच सदर गुन्हयातील मोबाईल सुद्धा पोलीस हवालदार बाबुराव मडावी यांनीच जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामे तयार केले.

०२) त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास मी माझ्याकडे घेतला. तपासकामी मला तक्रार, प्रथम खबर अहवाल, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामे, अटक पंचनामा असे कागद मिळाले. पोलीस हवालदार बाबुराव मडावी यांनी गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपी क्र.१ व फिर्यादीचा मोबाईल जप्त केला होता. फिर्यादीच्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक ३५५३६८११९७१२९५०/३५५३६९११९७१२९५८ असा होता. तसेच आरोपी क्र.१ च्या मोबाईलचा आयएमईआय क्रमांक ३५५६९३११५७७७८३४/३५५६९२११५७७७८३६ असा होता.

०३) त्यानंतर दिनांक ०६.११.२०२१ रोजी फिर्यादी व आरोपी क्र.१ च्या

मोबाईलची पंच व टेक्नीशियन यांच्यासमक्ष तपासणी केली व त्याचा पंचनामा तयार केला. सदर पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्याला **<u>नि.क्र.२३</u>** देण्यात आले. त्यानंतर दिनांक २३.११.२०२१ रोजी मी सदर दोन्ही मोबाईल उपसंचालक, प्रादेशीक न्यायसहायक वैज्ञानीक प्रयोगशाळा, नागपुर यांच्याकडे एका पत्रासोबत पाठविले. सदर पत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरच्या पत्राला **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात आले. सदर मोबाईल हे संबधीत कार्यालयाला दिल्याबाबत त्यांची नोंद सदर कार्यालयात घेण्यात आली. सदर नोंदीचे पत्र तसेच एक पोहोच पावती अभिलेखावर दाखल आहे. आता मला सदर नोंदीचे पत्र व पोहोच पावती दाखविण्यात आली. ते तेच आहे. त्यास **<u>नि.क्र.२५ व २६</u>** देण्यात आले.

४) त्यानंतर मी साक्षीदारांचे जवाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यानंतर मी आरोपी विरुद्ध सबळ पूरावा मिळुन आल्यामूळे सदरचा अंतिम अहवाल दाखल केला. माझ्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपींनी फिर्यादीच्या मोबाईलवर अश्लील व्हिडीयो पाठविले, तसेच दुस-या दिवशी फिर्यादीचा हात पकडुन तिचा विनयभंग केला तसेच तिला अश्लील शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. मी आरोपींना ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. (*आरोपींची आजची गैरहजेरी ओळखीचा वाद उपस्थीत न करण्याच्या अटीवर नि.क्र.२१ वरील आदेशाप्रमाणे आजच्या पूरती माफ करण्यात आली आहे.*)

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. यु. सी. घांगरेकर यांचे मार्फत सूरुः–</u>**

५) हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२३ वरील मोबाईल तपासणी पंचनामेकामी पंच नामे रोशन नंदनवार व चेतन शिरपुरे यांना लेखी समंसपत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईल तपासणीच्या वेळेस आरोपी व फिर्यादीला हजर राहण्याकामी मी पत्र दिले नव्हते. नि.क्र.२३ वरील मोबाईल तपासणीच्या पंचनाम्यावर आरोपी व फिर्यादीच्या सहया घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.११.२०२१ रोजी मी कुठलाही मोबाईल तपासणीचा पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मोबाईल हे कधीही उपसंचालक, प्रादेशीक न्यायसहायक वैज्ञानीक प्रयोगशाळा, नागपुर यांच्याकडे तपासणीकामी पाठविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कधीच नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरच्या

प्रकरणात योग्य तो तपास न करता आरोपींविरोधात खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क. केले.

माझे समक्ष,

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.04.17 15:43:24 +0530

(व्ही.एच.खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिंगणा.

हिंगणा.
दि.१७.०४.२०२६.